RNI No. MAHBIL /2009/37831

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–ब

वर्ष ५, अंक ६(२)] बुधवार, जानेवारी ९, २०१९/पौष १९, शके १९४० [पृष्ठे २, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक १२**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**वित्त विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय

मुंबई ४०० ०३२, दिनांक ९ जानेवारी २०१९

**अधिसूचना**

**महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम, २००२.**

क्रमांक मूवक.१५१९/प्र.क्र.०२/कराधान-१.—ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाची अशी खात्री झाली आहे की, महाराष्ट्र मूल्यवर्धित कर नियम, २००५ मध्ये तात्काळ सुधारणा करण्याजोगी परिस्थिती निर्माण झाली आहे, आणि त्यामुळे महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम, २००२ (२००५ चा महा. ९) च्या कलम ८३ च्या पोट-कलम (४) च्या परंतुकानुसार सदर नियमांना पूर्व प्रसिद्धी देण्याची अट पाळण्याची गरज नाही.

म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम ८३ च्या पोट-कलम (४) च्या परंतुकासह, पोट-कलमे (१) आणि (२) च्या शक्तींचा वापर करून तसेच यासंदर्भात प्राप्त झालेल्या सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र मूल्यवर्धित कर नियम, २००५ मध्ये आणखी सुधारणा करीत आहे, म्हणजेच :—

१. या नियमांना महाराष्ट्र मूल्यवर्धित कर (सुधारणा) नियम, २०१९ असे संबोधण्यात यावे.

२. महाराष्ट्र मूल्यवर्धित कर नियम, २००५ च्या नियम ६६ मध्ये, “अखेरीपासून नऊ महिने आणि पंधरा दिवसांच्या आत” या शब्दां ऐवजी “लगतच्या पुढील वर्षाच्या २८ फेब्रुवारी रोजी किंवा त्यापूर्वी ” हे शब्द व अंक दाखल करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**ज. वि. दिपटे,**

शासनाचे उप सचिव.

## FINANCE DEPARTMENT

Madam Cama Road, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya
Mumbai 400 032, dated 9th January 2019

*NOTIFICATION*

MAHARASHTRA VALUE ADDED TAX ACT, 2002.

No. VAT. 1519/C.R.02/Taxation-1.—Whereas, the Government of Maharashtra is satisfied that circumstances exist which render it necessary to take immediate action further to amend the Maharashtra Value Added Tax Rules, 2005 and to dispense with the condition of previous publication thereof under the proviso to sub-section (*4*) of section 83 of the Maharashtra Value Added Tax Act, 2002 (Mah. IX of 2005).

Now, therefore, in exercise of the powers conferred by sub-sections (*1*) and (*2*) read with the proviso to sub-section (*4*) of section 83 of the said Act, and of all other powers enabling it in this behalf, the Government of Maharashtra hereby makes the following rules further to amend the Maharashtra Value Added Tax Rules, 2005, namely :—

1. These rules may be called the Maharashtra Value Added Tax (Amendment) Rules, 2019.

2. In rule 66 of the Maharashtra Value Added Tax Rules, 2005, for the words “within nine months and fifteen days of the end of the” the words and figures “on or before 28th February of the immediate succeeding” shall be substituted.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

J. V. DIPTE,

Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY I/C DIRECTOR SHRI MANOHAR SHANKAR GAIKWAD, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : I/C DIRECTOR SHRI MANOHAR SHANKAR GAIKWAD.